२६९

३ महिन्यांच्या नोटिशीचा कालावधी समाप्त झाल्यावर शासकीय कर्मचा-याची सेवानिवृत्ती. -७-

महाराष्ट्र शासन
वित्त विभाग,
शासन परिपत्रक क्रमांक सेनिवे-१०८८/११४२/सेवा-४,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक २९ डिसेंबर १९८८.

परिपत्रक

शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक पीईएन-१०८३/सीआर-१२९६/८३/एसईआर-४, दिनांक १ ऑक्टोबर १९८४ अन्वये महाराष्ट्र नागरी सेवा [निवृत्तिवेतन] नियम, १९८२ मधील नियम १० च्या पोटनियम [४] अन्वये किंवा नियम ६५ मधील पोटनियम [१] अन्वये सेवानिवृत्त केला जाणारा किंवा उपरोक्त नियमांतील नियम १० च्या पोटनियम [५] अन्वये किंवा नियम ६५ मधील पोटनियम [१] अन्वये किंवा नियम ६६ अन्वये स्वत:हून सेवानिवृत्त होणारा, शासकीय कर्मचारी तीन महिन्यांच्या नोटिशीची मुदत संपण्याच्या तारखेनंतरच्या लगतच्या दिवशी शासकीय सेवेतून सेवानिवृत्त होतो. शासनाच्या असे निदर्शनास आले आहे की, शासकीय कर्मचा-याची सेवानिवृत्तीची तारीख सक्षम प्राधिका-याकडून त्याप्रमाणे ठरविली जात नाही. त्यामुळे, सेवानिवृत्तीच्या तारखेबाबत अडचणी उपस्थित होतात. याचा विचार करून सर्व संबंधितांच्या पुन्हा असे निदर्शनास आणण्यात येत आहे की, उपरोक्त [illegible]न्वये, ज्या शासकीय कर्मचा-याला सेवानिवृत्त केले जाते किंवा जो शासकीय कर्मचारी स्वत:हून सेवानिवृत्त होतो, असा कर्मचारी तीन महिन्यांच्या नोटिशीची मुदत संपण्याच्या तारखेनंतरच्या लगतच्या दिवशी शासकीय सेवेतून निवृत्त होईल.

या परिपत्रकाची इंग्रजी प्रत सोबत जोडली आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

वसंत चौधरी,
कार्यासन अधिकारी.

प्रत रवाना -

महालेखापाल-१ [लेखा व अनुज्ञेयता] महाराष्ट्र, मुंबई

Retirement of a Government Servant on expiry of 3 months' notice period.

GOVERNMENT OF MAHARASHTRA
Finance Department,
Circular No. PEN-1088/1142/SER-4,
Mantralaya, Bombay 400 032, dated the 29th December 1988.

**CIRCULAR**

According to the provisions contained in Government Resolution, Finance Department No. PEN-1083/CR-1296/83/SER-4, dated the 1st October 1984 a Government servant who is required to retire under sub-rule (4) of rule 10 or sub-rule (1) of rule 65 of Maharashtra Civil Services (Pension) Rules, 1982 or who chooses to retire under sub-rule (5) of rule 10 or sub-rule (1) of rule 65 or rule 66 of the aforesaid rules, stands retired from Government service on the day following the date of expiry of the notice period. It has been brought to the notice of Government that the date of retirement of such retiring Government servant is not determined accordingly by the appropriate authority. This creates complications in respect of the date of retirement. Taking this position into consideration, it is once again brought to the notice of all the concerned that a Government servant who is required to retire or who chooses to retire under the aforesaid rules, shall stand retired from Government service on the day following the date of expiry of the notice period.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

V.W. CHAUDHARI,
Desk Officer.